नि.फौ.ख.क्र.३०३६५६/२०११
शासन वि. शशीकांत व इतर
**निशाणी क्र. ९**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ याचा शपथेवर जवाब सुरू :—**

माझे नाव :— कविता अरविंद क—हाडे,
वय :— ५० वर्षे, व्यवसाय :— घरकाम,
राहणार :— कबीर नगर, नारी रोड, जि. नागपूर.

**<u>अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.पी. सोले मार्फत सरतपास सुरू</u>**

**:—**

मी आरोपींना ओळखतो. ते माझ्या घरामध्ये किरायाने राहतात. घटना कधी घडली हे मला आठवत नाही. घटनेच्या वेळी काहीही घडले नव्हते. असे घडले नव्हते की, आरोपींनी मला व माझया पतीला हाथाबुक्कीने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली होती.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे अभियोग पक्षातर्फे साक्षीदारास उलटतपास स्वरूपात प्रश्न विचारण्याची विंनती केली. परवानगी देण्यात आली :—**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८.१२.२०११ रोजी ११.०० वा. च्या सुमारास नागसेनवन येथील माझी स्वर्गवासी सासुची पुण्यतिथी असल्याने मी व माझे पती अरविंद पुजा करण्याकरीता गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यादरम्यान आरोपींनी तेथे येवून यहा पुजा करने की नही, मादरचोद, बहनचोद नही तो तेरे को तेरे पती को तलवार से मार डालुंगा अशी शिवीगाळ करून धमकी दिली व दोघांनी मिळून मला व माझया पतीला हातबुक्कीने मारहाण केली. आता मला माझ्या बयाणातील अधोरेखांकीत भाग अ दाखविण्यात आला. तो मी सांगितल्याप्रमाणे नाही, तसे माझ्या बयाणात का नमुद आहे, याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यात व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे ॲड. एस.जी. मेश्राम यांच्यामार्फत सुरू</u> : —**

उलटतपास नाकारला.
फेरतपास नाही.

दिनांक: १०/०८/२०२६

| | |
|---|---|
| समक्ष, | श्रवणोत्तर स्विकृत, |
| MAHESH SANJAYRAO PADWAD<br>Digitally signed by MAHESH SANJAYRAO PADWAD<br>Date: 2026.08.10 15:46:45 +0530 | MAHESH SANJAYRAO PADWAD<br>Digitally signed by MAHESH SANJAYRAO PADWAD<br>Date: 2026.08.10 15:46:51 +0530 |
| **( म. सं. पदवाड )**<br>१८ वे न्यायदंडाधिकारी<br>प्रथम श्रेणी, नागपूर | **( म. सं. पदवाड )**<br>१८ वे न्यायदंडाधिकारी<br>प्रथम श्रेणी, नागपूर |